# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ जुलै, २०१८ / आषाढ २२, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### शिवाजीनगर (ता.गेवराई, जि.बीड) येथील जयभवानी सहकारी साखर कारखाना लि. या कारखान्यातील व्यक्तीने केलेली आत्महत्या

**(१) * १२१४८३ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (ता.गेवराई, जि.बीड) येथील जयभवानी सहकारी साखर कारखाना मर्या. या कारखान्यामध्ये काम करीत असणाऱ्या श्री.सदाशिव कदम या व्यक्तीने कारखान्याकडून अंतिम वेतन व पतसंस्थेचे समभाग अनेक वेळा मागणी करुनही मिळत नसल्याने दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली व तसा मृत्यूपूर्वी लेखी जबाबही लिहून ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्याच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या कारखान्याच्या संचालक मंडळावर कारवाई करण्याबाबत तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांस आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्राथमिक चौकशीमध्ये शिवाजीनगर (ता.गेवराई, जि.बीड) येथील जयभवानी सहकारी साखर कारखाना लि. या कारखान्यातील सेवानिवृत्त कर्मचारी कै.सदाशिव कदम यांनी दि.५.५.२०१८ रोजी झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे आणि “कारखान्याकडून व पतसंस्थेकडून देय रक्कम मिळाली असती तर कर्ज काढण्याची व आत्महत्या करण्याची वेळ आली नसती.” असे कै.सदाशिव कदम यांनी सुसाईड नोटमध्ये नमूद केले असल्याचे दिसून आले आहे. त्यांच्या मृत्यु प्रकरणी पोलीस ठाणे तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड येथे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १७४ अंतर्गत आकस्मिक मृत्यु नं.१३/२०१८ दाखल केलेला असून त्यांच्यामार्फत सदर प्रकरणी चौकशी चालू आहे.

कै.सदाशिव श्रीपतराव कदम हे जयभवानी सहकारी साखर कारखाना लि., शिवाजीनगर, जि.बीड येथे शेतकी विभागाकडे लिपिक म्हणून कामावर होते. सन २०१३ मध्ये श्री.कदम सेवानिवृत्त झाले होते. सन २०१२-१३ ते २०१६-१७ या हंगामात दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी व ऊसाअभावी कारखाना बंद होता. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारासह इतर अनेक देणी थकीत झालेली होती. आर्थिक अडचणीमुळे श्री.कदम यांच्या उपदान वेतनाची रक्कम देता आली नाही.
(३) कै.सदाशिव कदम यांच्या पत्नी श्रीमती सुलोचना सदाशिव कदम यांनी मागणी केल्यानुसार व त्यांच्या मुलाने संमतीपत्र दिल्यानुसार जयभवानी सहकारी साखर कारखाना लि., शिवाजीनगर, ता.गेवराई, जि.बीड कारखान्याने मयत कर्मचारी यांचे उपदान/पगार रुपये २,३३,५१९/- दिनांक १९.०५.२०१८ रोजी डी.डी.क्र.०८१२४७ द्वारे त्यांच्या पत्नी श्रीमती सुलोचना सदाशिव कदम यांच्या नावाने अदा केलेले आहे. तसेच, कै.सदाशिव श्रीपतराव कदम यांनी

पतसंस्थेचा सभासदत्वाचा राजीनामा दिलेला नसून यापूर्वी त्यांनी शेअर्सची रक्कम परत मिळणेबाबत मागणी केलेली नव्हती. त्यांची पत्नी श्रीमती सुलोचना कदम यांनी दि.१६.०५.२०१८ रोजी शेअर्सची रक्कम परत मिळणेबाबत मागणी केल्यानुसार त्यांच्या मुलाच्या संमतीने रु.२२,६२०/- दि.१७.०५.२०१८ रोजी रोखीने अदा केलेले आहे.

सदर प्रकरणी गृह विभागामार्फत सविस्तर चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहकल (ता.खेड, जि.पुणे) येथे विजेचा धक्का लागून जखमी झालेल्यांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(२) * १२०१४३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहकल (ता.खेड, जि.पुणे) येथे वीजवाहक तार जमिनीवर पडून रस्त्याने जाणाऱ्या दुचाकीस अडकल्याने विजेचा धक्का लागून आई व मुलगा भाजल्याची घटना दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कारभारामुळे सदर दुर्घटना घडली असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या कर्मचारी वा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. दिनांक १९/०५/२०१८ रोजी मौजे रोहकल (ता.खेड, जि.पुणे) येथील रोहकल (१०० केव्हीए) डिटीसीला वीज पुरवठा करणाऱ्या २२ केव्ही उच्चदाब उपरी तार मार्गातील “वाय” फेजचा विद्युत भारीत वाहक तुटून त्या ठिकाणी

दुचाकीवरुन जाणाऱ्या श्री.विशाल दशरथ काचोळे व त्यांची आई श्रीमती विमल दशरथ काचोळे यांच्या अंगावर पडला व त्यांना वीजेचा धक्का बसून सदरचा अप्राणांतिक अपघात झाला.
(३) घटनास्थळावरील वीज संच मांडणीतील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयाकडून दि.११/६/२०१८ रोजीच्या ज्ञापनान्वये महावितरण कंपनीस सूचित केले आहे. अपघातग्रस्तांना महावितरण कंपनीचे नियमानुसार तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रु.३०००/- देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोहरा पुर्णा (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील नागरिकांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत

**(३) * १२३९५१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोहरा पुर्णा (ता.भातुकली, जि.अमरावती) येथे सध्या सिंगल फेज विदयुत पुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या गावात ३ फेज विद्युत पुरवठा सुरु करणेबाबत स्थानिक लोकपतिनिधींनी कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी मर्या. (ग्रामीण) अमरावती यांना दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने सदर गावात पाहणी केली आहे काय, त्यानुसार गावात ३ फेज विद्युत पुरवठा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीकडून पोहरा पुर्णा या गावामध्ये नवीन लघुदाब वीज वाहिनीचे ५ पोलचे काम व १० स्पॅनचे (१ फेज ३ वायर ते ३ फेज ५ वायर रुपांतरण) चे काम देखभाल व दुरुस्ती या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आले असून वाहिनी दि. १२ जून २०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे त्याठिकाणची कमी दाबाच्या वीजेची समस्या दूर झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोसरी (जि.पुणे) येथील अण्णासाहेब मगर सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(४) * १२४७६८ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसरी (जि.पुणे) येथील अण्णासाहेब मगर सहकारी बँकेत कर्जवाटप, आर्थिक व्यवहार, जागा खरेदी, वाहन खरेदी, इमारत बांधकाम इत्यादी बाबींमध्ये गैरव्यवहार झाला असल्याने बँकेच्या सभासदांनी सहकार आयुक्त व सहकार निबंधक यांचेकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बँकेत लेखापरिक्षणात नियमबाह्य कारभार आढळून आल्याचेही निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.
(३) अण्णासाहेब मगर सहकारी बँक लि. भोसरी या बँकेच्या अध्यक्षांच्या गैरव्यवहाराबाबत बँकेच्या सभासदांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे-६ यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालामधील मुद्द्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम, १९६० चे कलम ८१ अन्वये चाचणी लेखापरिक्षण करण्यासाठी दिनांक १९.९.२०१७ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली.

उपरोक्त चाचणी लेखापरिक्षण अहवालातील गंभीर मुद्द्यांच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक २५.५.२०१८ च्या आदेशान्वये प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जामखेड (जि.अहमदनगर) येथील शेतकरी श्री.धोंडीराम शिरसाठ यांनी कर्जमाफीपासून वंचित रहावे लागल्याने केलेली आत्महत्या

**(५) * ११७४८४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहमदनगर) येथील शेतकरी कै.धोंडीराम शिरसाठ हे एका हाताने अपंग व दुसऱ्या हाताच्या अंगठ्याचे ठसे व्यवस्थित उमटत नसल्याने त्यांना आधारकार्ड मिळाले नाही त्यामुळे त्यांना कर्जमाफीसाठी वंचित रहावे लागल्याने त्यांनी गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कै.शिरसाठ यांनी सन २००८-०९ मध्ये एका खासगी बँकेकडून शेतीच्या कामासाठी ५० हजाराचे घेतलेले कर्ज १० वर्षात मुद्दल व व्याजासह १.५ लाखापर्यंत गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार कर्जमाफी करताना शासनाने घातलेल्या या जाचक अटीमुळे सदरहू शेतकऱ्यास कर्जमाफीपासून वंचित रहावे लागल्याने शासन या अटीबाबत पुनर्विचार करणार आहे काय तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांस कर्जमाफी करुन आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

योजनेअंतर्गत आधार कार्डाशिवाय पोर्टलवर कर्जमाफीसाठी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. याप्रकारे सुमारे २.४० लाख अर्जही प्राप्त झाले आहेत. अशा परिस्थितीत आधार कार्ड नसल्याच्या कारणामुळे कर्जमाफीपासून वंचित राहून सदर शेतकऱ्याने आत्महत्या केली हे म्हणणे बरोबर नाही.

(२) नाही.

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा जामखेड यांच्याकडून कै.शिरसाठ यांनी दि.१४.०७.२००९ रोजी रक्कम रूपये ५०,०००/- इतके कर्ज घेतले असून दि.३०.०६.२०१८ अखेरपर्यंत मुद्दल व व्याजासह रक्कम रूपये ४२,५००/- भरणा केली असून मुद्दल व व्याजासह रक्कम रूपये २६,६३४ येणे बाकी आहे.

(३) कै.शिरसाठ यांच्या वारस पत्नी श्रीमती मिरा धोंडीराम शिरसाठ यांना शासन धोरणाप्रमाणे आर्थिक मदत म्हणून रक्कम रूपये १,००,००० चा लाभ देण्यात आलेला आहे. कर्जमाफी योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना अर्ज करता यावा याकरिता दि.०१.०३.२०१८ ते दि.१५.०६.२०१८ पर्यंत पुन्हा सुविधा उपलब्ध करून दिली होती. या कालावधीत १,३०,००० पेक्षा जास्त अर्ज देखील प्राप्त झाले आहेत. याप्रमाणे सदर योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरू असून कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचीत राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. त्यामुळे योजनेचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास मंडळाचा कृषि पंप व पाईप वाटप योजनेचा निधी तसेच खावटी कर्जाची रक्कम परत करण्यात आल्याबाबत

**(६) * ११८२३७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार**

**(सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाचे अध्यक्ष तसेच महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक यांनी आदिवासींच्या विकासासाठीच्या योजना बंद केल्या असून महामंडळ निष्क्रीय झाले असल्याने खावटी कर्जाचेच १०० कोटी रुपये शासनाला परत करावे लागल्याबद्दल महामंडळाचे संचालक दिनांक ६ मार्च, २०१८ पासून उपोषणाला बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास मंडळाचा कृषी पंप व पाईप वाटप योजनेचा ४३ कोटी निधी तसेच खावटी कर्जाचे ७० कोटी रुपये संचालक मंडळास न विचारता शासनास परत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे कि महामंडळाच्या संचालक हे खावटी कर्ज योजना सुरु करणे व इतर मागण्यांसाठी उपोषणास बसले होते.

(२) व (३) दि.१२.१०.२०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये तेलपंपाचा (सन २०१५-१६ व २०१६-१७) निधी व वीज पंप व एच.डी.पी.ई. पाईपचा (सन २०१५-१६ व २०१६-१७) निधी शासनास वर्ग करण्यात यावा व तसे शासनास अवगत करावे, असा ठराव मंजूर करण्यांत आला. त्यानुसार, आदिवासी विकास मंडळाच्या कृषी पंप व पाईप वाटप योजनेचा रु.५.४७ कोटी इतका निधी, तसेच खावटी कर्जाचे रु.७०.२४ कोटी व केंन्द्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे रु.४.७३ कोटी इतकी रक्कम शासनाकडे परत करण्यात आली.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद, परळी, नांदेड, श्रीरामपूर व लातूर येथील वखार महामंडळाने मर्जीतील ठेकेदारांना धान्य पुरवठ्याचा ठेका दिल्याबाबत

**(७) * १२२२७० श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद, परळी, नांदेड, श्रीरामपूर, लातूर येथील स्वस्त धान्य दुकानदारांना करण्यात येत असलेला अन्नधान्याचा पुरवठा करण्याच्या दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी काढलेल्या वाहतुकीच्या ठेक्यामध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी शुध्दीपत्रक काढून मर्जीतील ठेकेदारांना चार पट अधिक तसेच वेगवेगळ्या दराने ठेका दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) या संदर्भात शासन स्तरावर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, वखार महामंडळ यांनी सदर प्रकरणी संचालक मंडळानी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर केलेला असल्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय व त्यासंबंधीची माहिती संचालक मंडळासमोर ठेवण्याची सुचना देण्यात आली. संचालक मंडळाच्या दि. २९/५/२०१८ रोजीच्या सभेत या प्रकरणी घेतलेल्या निर्णयाची माहिती मागविण्यात आली आहे. तसेच एका संयुक्त भागीदारी प्रकल्प सल्लागार सनदी लेखापालकडून झालेल्या व्यवहाराचे लेखापरिक्षण करुन घेण्यात येत आहे. त्याचा अहवाल प्राप्त व्हायचा आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार

**(८) * ११७४०८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पतसंस्थेतील १६ कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणी व्यवस्थापक यांच्यासह संचालक यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) सदर पतसंस्थेच्या सन २०१६-१७ च्या लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने संस्थेचे अध्यक्षांनी संस्थेचे तत्कालीन संचालक श्री.संजय डिंगणकर, तत्कालीन पिग्मी ऐजंट सौ. श्रेया संजय डिंगणकर आणि तत्कालीन सचिव श्री.राजेंद्र लवलेकर यांच्या विरुध्द दिनांक ३१/१/२०१८ रोजी एफ.आय.आर क्रमांक ०२२ दाखल केला. त्यानुसार श्री.संजय डिंगणकर व सौ.श्रेया डिंगणकर यांना दि.१५/३/२०१८ रोजी अटक करण्यात आली. संबंधितांना दि.१९/४/२०१८ रोजी जामीन मंजूर झाला असून संस्थेचे तत्कालिन सचिव श्री.राजेंद्र लवलेकर फरार असल्याचे निदर्शनास आले आहे.

पतसंस्थेच्या सन २०१६-१७ च्या लेखापरिक्षण अहवालावरील विशेष अहवाल दि.१५/३/२०१८ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, चिपळूण यांना सादर करण्यात आला असून सदर अहवालानुसार संबंधित दोषींविरुध्द एफ.आय.आर दाखल करण्यासाठी लेखापरिक्षकांना दि.१६/४/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

या संस्थेच्या सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची छाननी करण्यात आली. त्याप्रमाणे लेखापरीक्षकांनी संस्थेचे मागील ५ वर्षाचे फेर लेखापरिक्षण करण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाचे फेर लेखापरिक्षण करणेसाठी श्री.एस.व्ही.सासवडकर, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, चिपळूण यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान सन २०१३-१४ व २०१५-१६ या वर्षांचे लेखापरिक्षण अहवालामध्ये सदरचा गैरव्यवहार निदर्शनास न आणल्याने संबंधित प्रमाणित लेखापरिक्षक सौ.शर्वरी नेने यांचे नाव लेखापरिक्षकांच्या नामतालिकेवरुन कमी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर व अंधेरी येथील वीरशैव सहकारी बँकेतील ठेवीदार व खातेधारकांचे पैसे परत मिळण्याबाबत

**(९) * १२३५०४ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर व अंधेरी येथील वीरशैव सहकारी बँक मर्या. (ठाणे) यांचे बँकिंग लायसन्स भारतीय रिझर्व्ह बँकेने बँक व्यवस्थापन हे ठेवीदार व खातेदारांच्या हितास हानिकारक पद्धतीने कारभार करीत असल्यामुळे व बँकेत सुमारे ३० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्यामुळे बँकिंग रेग्युलेशन ऍक्ट १९४९ च्या कलम २२ (५) अन्वये दिनांक ३० डिसेंबर, २०११ रोजी रद्द केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिझर्व्ह बँकेने परवाना रद्द केल्यामुळे राज्य शासनाचे सहकार आयुक्त यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ११० (२) अन्वये दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी अवसायकांची नेमणूक करून त्वरित बँकेच्या पूर्ण कर्मचारीवृंदाची सेवासमाप्ती करून अवसायन प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन अवसायकांनी लगेच कर्मचारीवृंदाची सेवासमाप्ती न करता त्यांना तब्बल ३ वर्ष पर्यंत काहीही काम न करता सुमारे रुपये २० कोटी रुपये पगार ठेवीदार व खातेदारांच्या बचतीमधून बेकायदेशीरपणे व नियमबाह्यपणे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहकार विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी बँकेच्या मालमत्तेचे मूल्यांकन व निश्चितीकरण न करता अवसायनाची प्रक्रिया अद्यापपर्यंत प्रलंबित ठेऊन ठेवीदारांच्या मुद्दल व व्याजाचे नुकसान केले

असून अवसायक मंडळाने मालमत्तेचे मूल्यांकन यथोचित यंत्रणेमार्फत केल्यानंतरही सहकार आयुक्त सदर मालमत्तेचा लिलाव करण्यास परवानगी देत नसल्यामुळे ठेवीदार व खातेधारकांना परतावा मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवसायनाच्या प्रक्रियेस विलंब लावणा-यांवर कारवाई करण्याबाबत व सदर प्रक्रिया लवकर पूर्ण करून ठेवीदार व खातेधारकांचे पैसे परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

(३) सदर बॅंकेच्या कर्मचारी संघटनेने कर्मचा-यांना कमी करण्यात येऊ नये अशा आशयाची रिट याचिका क्रमांक १०१५/ २०११ मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.७/४/२०११ रोजी दाखल केली होती. दरम्यान रिझर्व्ह बॅंकेने दिनांक ३०/१२/२०११ रोजीच्या आदेशान्वये विरशैव को. ऑप बॅंकेचा बॅंकींग परवाना रद्द केला आहे.

रिझर्व्ह बॅंकेच्या सदर आदेशाविरुद्ध बॅंक व्यवस्थापनाने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १८९२/२०१३ दाखल केली. सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३०.१.२०१४ रोजीच्या आदेशान्वये बॅंकेचे कर्मचारी कमी करण्याच्या कार्यवाहीस स्थगिती दिली.

ही स्थगिती मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ६.१.२०१५ रोजीच्या आदेशान्वये उठविल्यानंतर अवसायकांनी दिनांक ५.२.२०१५ रोजी बॅंकेच्या सर्व ७२ कर्मचाऱ्यांना कमी केले असून अवसायनाच्या दिनांकापासून सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर रु.६.६५ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

(४) व (५) बॅंकेच्या मालकीच्या एकूण ६ स्थावर मालमत्तांपैकी रु.२१.०१ कोटी मुल्यांकनाच्या ४ मालमत्तांच्या विक्रीची परवानगी दिनांक ७/५/२०१८ रोजी देण्यात आली असून उर्वरीत २ मालमत्तांच्या वाजवी मुल्यास विक्रीची परवानगी दि.३०/६/२०१८ रोजी देण्यात आली आहे. बॅंकेच्या अवसायनापासून २०,२७४ ठेवीदारांना एकूण रु. ७२.२३ कोटीच्या ठेवींचे वाटप करण्यात आले असून ६१७ कर्जदारांकडून रु. २९.२७ कोटी रक्कमेची वसूली करण्यात आली आहे. उर्वरीत ४९५ कर्जदारांकडून कर्ज वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये ३९ अपचारी व्यक्तींवर रु. ९८.४८ कोटी रकमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून अधिनियमातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपुर व मंगळवेढ़ा (जि.सोलापुर) तालुक्यातील निराधारांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत निधी मिळणेबाबत

**(१०) * १२१३९९ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापुर) तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ४ महिन्यांपासून निराधारांना निधीअभावी आर्थिक मदत मिळाली नसल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर शहर व तालुक्यातील सुमारे २ हजार ६७८ लाभार्थी यांना ४ महिन्याचे मानधन न मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पंढरपूर तालुक्यातील विधवा, परित्यक्ता, निराधार महिला, अपंग आदि दुर्बल घटकांचे मानधनाचे काम करणारी समिती कार्यरत नसल्यामुळे मानधन प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने ४ महिन्यांचे मानधन थकित मिळण्याबाबत तसेच समिती गठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) या तालुक्यामध्ये संजय गांधी योजना समिती गठीत झालेली नाही.

अशा तालुक्यामध्ये लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्याचे अधिकार तहसिलदार यांना दिनांक ०५ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार ३१/०३/२०१८ रोजीच्या लाभार्थी निवड बैठकीत ६९ प्रकरणांपैकी ४५ प्रकरणे मंजूर तर २४ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत. तसेच समिती गठीत करण्याबाबत यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील जेएसडब्ल्यू कंपनीमध्ये परप्रांतियांची भरती करण्यात येत असल्याबाबत

**(११) * ११७७७१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील जेएसडब्ल्यू कंपनीमध्ये कामगार भरती करतांना स्थानिकांना डावलून परप्रांतियांची भरती करण्यात येत असल्याच्या विरोधात हजारो शेतक-यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पेण तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधी भूमिपुत्रांना नोक-या द्याव्यात नाहीतर तीव्र आंदोलन करु असा इशाराही कंपनीला दिला असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार शासनाने भूमिपुत्रांना नोक-या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) पेण तालुक्यातील (जि.रायगड) जेएसडब्ल्यू कंपनीमध्ये कामगार भरती करतांना स्थानिकांना डावलून परप्रांतियांची भरती करण्यात येत असल्याच्या विरोधात हजारो शेतक-यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या सुमारास पेण तहसिल कार्यालयावर धडक

मोर्चा काढला असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, भूमिपुत्रांना आधी नोकऱ्या द्याव्यात नाहीतर तीव्र आंदोलन करू असा इशारा शेतकऱ्यांनी कंपनीला दिला आहे. यावर कंपनी प्रशासनाने दिवाणी न्यायालय, पेण यांचेकडून जैसे थे परिस्थिती (Status-quo) आदेश प्राप्त करून घेतला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायत सदस्य डोलवी, गडब-वडखळ व शहाबाज यांनी त्यांचे आंदोलन स्थगित केल्याचे तहसीलदार पेण यांना लेखी कळविलेले आहे.

मे. जे.एस.डब्ल्यू. स्टील लिमिटेड, डोलवी ता. पेण येथे हा घटक कार्यरत असून या कंपनीने एकूण ३,१४१ इतक्या लोकांना रोजगार दिला असून त्यापैकी पर्यवेक्षकीय श्रेणीत एकूण १,४४१ इतके लोक कार्यरत असून त्यापैकी ८२६ स्थानिक लोकांना म्हणजेच ५७.३२ % लोकांना पर्यवेक्षकीय श्रेणीत रोजगार प्राप्त झालेला आहे. या घटकामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीसह इतर श्रेणीत २२३७ म्हणजेच ७१.२४% एवढ्या स्थानिक लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १७.११.२००८ अन्वये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५०% व पर्यवेक्षकीय श्रेणीसह इतर श्रेणीत ८०% स्थानिक लोकांना रोजगार देणे आवश्यक आहे. तथापि, या घटकामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीसह इतर श्रेणीत फक्त ७१.२४% एवढ्याच स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आलेला असल्यामुळे किमान ८०% स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्याबाबत कालबध्द नियोजन सादर करण्याबाबत महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र रायगड यांच्याकडून कंपनीस कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुसरवाडी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाचा अन्नपुरवठा केल्याबाबत

**(१२) * ११९३२४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुसरवाडी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाच्या अन्नधान्याच्या वापरामुळे आश्रमशाळेत शिकणाऱ्या सुमारे सहाशे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याने ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व आश्रमशाळेत सकस व चांगल्या दर्जाचा अन्नपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) यासंदर्भात दिनांक २४/०४/२०१८ रोजी दैनिक "सामना" या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर आश्रमशाळेचे सत्र दि. १३/०४/२०१८ रोजी संपलेले होते. सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये बातमीमधील वस्तुस्थिती आढळून आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर पश्चिम आणि दक्षिण भागातील सहयाद्रीच्या पठारावरुन बॉक्साईटचे बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१३) * ११८३३२ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर पश्चिम आणि दक्षिण भागातील सहयाद्रीच्या पठारावरुन बॉक्साईटचे बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु असल्याने सदर प्रकरणी सीआयडी विभागामार्फत चौकशी करुन कारवाई करावी, अशा आशयाची तक्रार तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर, तहसिलदार, राधानगरी तसेच मा.पालक मंत्री, कोल्हापूर जिल्हा व मा.खनिकर्म मंत्री यांना माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, राधानगरी व शाहूवाडी तालुक्यात शासनाने हिंडाल्को, भरतेश कन्स्ट्रक्शन आणि शिवराम मिनरल या तीन औद्योगिक कंपन्यांना बॉक्साईट उत्खननाचे परवाने दिले असून उक्त कंपन्यांनी किती बॉक्साईटचे उत्खनन केले आणि किती बॉक्साईट वाहून नेले याची मोजणी करण्यासाठी त्या-त्या ठिकाणी कोणतीही शासकीय यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उत्खननासाठी सुरु असलेल्या अवजड यंत्रणेमुळे जंगली प्राण्यांचे स्थलांतर डोंगराळ भाग सोडून मानवी वस्तीमध्ये होऊ लागले असून ऐतिहासिक स्थळांनाही धोका निर्माण झाला असून याबाबत विभागाकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बॉक्साईटचे होत असलेले अवैध उत्खनन थांबविण्याबाबत व उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) या संदर्भात कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी तालुक्यात अवैध बॉक्साईटच्या उत्खननाबाबत दि.१५.३.२०१८ रोजी डॉ.शिरिष पुणतांबेकर यांचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

(२) कोल्हापूर जिल्हयातील मे.हिंदाल्को, मे.भरतेश कन्ट्रक्शन, मे.शिवराम मिनरल या बॉक्साईट खाणपट्टा धारकांनी केलेले बॉक्साईट उत्खनन Total Station यंत्राद्वारे सन २०१३-१४ मध्ये मोजणी केलेली आहे. सदर क्षेत्राची पुनश्च मोजणी करण्याचे प्रस्तावीत आहे.

(३) नाही. अशी कोणतीही तक्रार संबंधीत कार्यालयास प्राप्त नाही.

(४) कोल्हापूर जिल्हयातील बॉक्साईटच्या खानपट्टयाचे MAHAGIONMIN प्रकल्पांतर्गत DIGITISATION करण्यात आले आहे. त्यामुळे खाणपट्टयाबाहेर उत्खनन झाल्यास त्वरित Satelite Image निदर्शनास येते. तसेच केंद्र शासनाचे देखील याकरिता BISAG, Ahmedabad येथे विशेष कक्ष Integrated Lease Management System ही प्रणाली स्थापित केली असून त्याद्वारे खाणकामाच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त परिमाणाचे उत्खननावर नियंत्रण ठेवता येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) येथील सावळेश्वर या गावातील शेतकऱ्याने कर्जमाफीच्या यादीत नाव नसल्याने केलेली आत्महत्या

**(१४) * ११७४१८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मनोहर भोईर (उरण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील सावळेश्वर या गावातील श्री.माधवराव शंकरराव रावते या शेतकऱ्याने कर्जमाफीच्या यादीत नाव नसल्याने स्वत:च्या शेतात सरण रचून आत्महत्या केली असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बिटरगाव पोलिसांनी पंचनामा करुन सदर प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री.माधव रावते या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व आकस्मिक मृत्यूची खोटी नोंद करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) होय.
(३) जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्या अहवालानुसार मृतक माधवराव रावते हे दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी दुपारी १२:३० च्या दरम्यान त्यांचे शेतात पऱ्हाटी चे ढिगाराच्या सावलीत बसून बिडी  पेटवितांना विस्तवाची ठिणगी त्या पऱ्हाटीच्या ढिगाऱ्यावर पडल्याने ढिगाऱ्याला आग लागली व ते वयोवृध्द असल्याने त्यांचा तोल जावून आगीत पडले व आकस्मितपणे जळून मरण पावले.

जिल्हा समितीच्या सभेमध्ये मृतक माधवराव रावते यांची आत्महत्या शेतीविषयक कारणाने झालेली नसल्याने शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीसाठी सदर प्रकरण अपात्र ठरविण्यात आले आहे.

मृतक माधवराव रावते यांना दिनांक २९.११.२०१७ रोजी कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील मिनीडोअर रिक्षा स्टॅन्ड जवळील अती उच्च दाबाचे विद्युत रोहित्र धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(१५) * १२१३९५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील वर्दळीच्या व सातत्याने गजबजलेल्या मिनीडोअर रिक्षा स्टॅन्ड जवळील अती उच्च दाबाचे विद्युत रोहित्र मागील

अनेक कालावधीपासून उघडया व धोकादायक अवस्थेत असताना वीज वितरण कंपनीच्या अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक विद्युत रोहीत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावे अशी मागणी मीनिडोअर चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे मागील ६ महिन्यांपासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे  केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त  निवेदनाच्या अनुषंगाने आजमितीस कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसून याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व याठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार धोकादायक विद्युत रोहीत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात  येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर रोहित्राच्या वीजवितरण बॉक्सचा एक दरवाजा मोडलेल्या स्थितीत होता. सदर मोडकळीस आलेल्या बॉक्सच्या दरवाज्याचे काम महावितरण कंपनी मार्फत तातडीने पूर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.  मिनीडोअर चालक मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून सदर बाबतीत तोंडी मागणी महावितरण कंपनीच्या पाली शहर शाखेकडे करण्यात आली होती.

(३) सदर रोहित्र इतरत्र ठिकाणी हलविण्याचे काम वाकण पाली खोपोली रस्ता रुंदीकरणाच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करुन डीडीएफ १.३% स्कीममध्ये दि. ०५/०३/२०१८ रोजी मंजूर करण्यात आले आहे. सदरचे काम कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांच्यामार्फत पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे डोणगांव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बॅंकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासनाची केलेली फसवणूक

**(१६) * ११९१२२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोणगांव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बॅंकेमार्फत बॅंकेतील अधिकारी, कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक व काही दलालांनी संगनमत करुन डोणगांव परिसरातील खेड्या-पाड्यातील भूमिहिनांचे बनावट कागदपत्रे करुन शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच दलांलावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. सदर प्रकरणी विदर्भ कोकण ग्रामीण बॅंकेच्या वरिष्ठ प्रबंधकामार्फत खातेअंतर्गत चौकशी करण्यात आली आहे.

(३) क्षेत्रीय प्रबंधक, विदर्भ कोकण ग्रामीण बॅंक, अकोला यांनी दिनांक १४/६/२०१८ रोजी ठाणेदार, पोलीस स्टेशन, मेहकर यांना कार्यवाही करणेसंदर्भात पत्र दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेनीखुर्द खेरवसे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) परिसरात महावितरण कंपनीचे वीज खांब व वीज वाहिन्या जीर्ण झाल्याबाबत

**(१७) * १२३९४९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेनीखुर्द खेरवसे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) परिसरात महावितरण कंपनीचे अनेक वीज खांब तसेच वीज वाहिन्या जीर्ण झाल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी लोंबकळत असणा-या वीज वाहिन्या व खांब तातडीने बदलण्याबाबत अनेकवेळा सबंधित विभागाकडे लेखी पत्राद्वारे मागणी करूनही महावितरण कंपनीचे दुर्लक्ष होत आहे, तसेच गावामध्ये गेल्या सहा महिन्यापासून वायरमन उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची गैरसोय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात वाहिन्या जीर्ण अवस्थेत असून जिवीतीला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदर खांब तात्काळ बदलण्याबाबत व वायरमन उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उपविभाग लांजा अखत्यारित लांजा तालुक्यातील महावितरणच्या जीर्ण झालेल्या वीज वाहीन्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी दि. १५/०५/२०१८ रोजी मे. आस्था इलेक्ट्रीकल्स या ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. सदर ठेकेदाराने सदर तालुक्यातील आतापर्यंत एकूण ७ जीर्ण अवस्थेतील पोलांची दुरूस्ती/ बदलीचे काम पूर्ण केले आहे व उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

बेनीखुर्द हे गाव महावितरण लांजा उपविभागांतर्गत शाखा कार्यालय लांजा-१ च्या अखत्यारित येते. सदर शाखा कार्यालयांतर्गत बेनीखुर्द सह एकूण २३ गावे येतात. सदर २३ गावातील वीज ग्राहकांच्या सेवेसाठी प्रधान तंत्रज्ञ - १, वरिष्ठ तंत्रज्ञ- ३, तंत्रज्ञ-७, विद्युत सहाय्यक-१, बाहयस्त्रोत कर्मचारी-२ असे एकूण १४ कर्मचारी सेवेत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिमेकडील आदिवासी भागातील गावांत वीजपुरवठा खंडित झाल्याबाबत

**(१८) * ११८९२३ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिमेकडील आदिवासी भागातील देवळे, उंडेखडक येथे अवकाळी पाऊस व वादळी वा-यांमुळे विजेचे खांब वाकले असून यामुळे येथील हडसर, राजूर नंबर १ व २ पेठेचेवाडी, केवाडी, खटकाळे, देवळे, खैरे, निमगिरी आदी गावांत वीजपुरवठा खंडित झाल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे कुरवंडी (ता.आंबेगाव, जि.पुणे) परिसरातील शेतातून गेलेले विजेचे खांब एका बाजूला वाकल्याने वीज प्रवाहित तारा खाली येऊन शेतकऱ्यांच्या व पाळीव जनावरांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी महावितरण कंपनीचे कार्यालय, आंबेगाव यांच्याकडे लेखी पत्राद्वारे वारंवार लक्ष वेधूनही शासनाने अद्यापही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) त्यानुसार जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील गावांत वीजपुरवठा पुर्ववत होण्यासाठी व मौजे कुरवंडी येथील शेतातून गेलेल्या वीजेच्या तारा तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे कुरवंडी येथील एक वीजेचा खांब एका बाजूला झुकलेला होता. दि. ०८/०५/२०१८ रोजी सदर वीजेच्या खांबाची दुरुस्ती महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली आहे.

(४) जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील पाहणी केली असता ११ के.व्ही. वाहिनीचे १७ खांब व लघुदाब वाहिनीचे ८ खांब पडलेले आढळून आले. तसेच मौजे कुरवंडी येथे २ खांबातील अंतर जास्त असल्यामुळे तारा सैल झाल्याचे आढळून आले.

(५) दि. २३/०४/२०१८ रोजी जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील विद्युत खांब व विद्युत वाहिनींची उभारणी करुन विद्युत पुरवठा महावितरण कंपनीकडून सुरळीत करण्यात आला आहे. तसेच दि. ०८/०५/२०१८ रोजी मौजे कुरवंडी गावातील वीजेच्या खांबाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्याने अर्थसंकल्पीय अनुदान परत गेल्याबाबत

**(१९) * ११९६३० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय योजना सुरू केली असून या योजनेतंर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक निवास, साहित्य खरेदीचा खर्च देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्याने अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार यावर्षीचे ३५ कोटी रुपये अनुदान शासनाकडे परत गेल्याची बाब माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतंर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर योजना योग्य पद्धतीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे म्हणून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत महापालिका, विभागीय तसेच जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये इयत्ता १२ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवास, आहार तसेच शैक्षणिक साहित्याकरिता निर्धारीत केलेली रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

(२) व (३) सन २०१५-१६ या वर्षात विभागांतर्गत कार्यान्वीत ४९१ शासकीय वसतीगृहांची इमारत क्षमता लक्षात घेऊन एकूण ५८,३७८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता.

याव्यतिरिक्त पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेंतर्गत सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षामध्ये सुमारे ४००० अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

सन २०१५-१६ या वर्षी राज्यस्तर योजनेंतर्गत प्राप्त तरतूदीमधून आवश्यक रू.१५३.०५ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे व उर्वरित रू.२७.९३ कोटी निधीचे पुनर्विनियोजन करण्यात आले आहे.

(४) शासकीय वसतीगृह योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश घेण्याकरिता ऑनलाईन संगणकीय प्रणाली सुरू करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे वसतीगृह योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्ता, बेडींग साहित्य, स्टेशनरी, आहार इत्यादी सोयी सुविधांकरिता देय असलेल्या रकमा या थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेद्वारे पात्र लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील शिरूर ग्रुप कार्यकारी सहकारी संस्थेतील गैरव्यवहाराबाबत

**(२०) * १२३८५४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील शिरूर ग्रुप कार्यकारी सहकारी संस्थेत ४ कोटी २१ लक्ष ७५ हजार २४५ रूपये इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिक कर्जाच्या परतफेडीची रक्कम बँक खात्यात जमा न करता सदर रकमेचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सहकारी संस्था श्रेणी-१ च्या लेखापरिक्षकाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या मुख्य कार्यकारी व्यवस्थापकांना ७ दिवसात खुलासा करण्याची मागणी केली असून सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहारातील दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर सहकारी संस्थेचे फेरलेखापरिक्षण करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे ग्रामीण यांनी निर्गमित केले आहेत. त्यानुसार सहकारी संस्था श्रेणी-१ च्या लेखापरीक्षक यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विकास अधिकारी यांना बँकेचे मुख्य कार्यकारी व्यवस्थापक यांचे मार्फत ७ दिवसात खुलासा देण्याकरीता कारणे दाखवा नोटीस दिनांक २४/०५/२०१८ अन्वये दिली होती. सर्व संबंधितांकडून खुलासे प्राप्त झाले असून तपासणीचे कामकाज पूर्ण झाले आहे. लेखापरिक्षकाकडून लवकरच अहवाल सादर करण्यात येणार आहे.

(४) संस्थेच्या फेरलेखा परिक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गैरव्यवहारातील दोषींविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशीम शहरातील (जि.वाशिम) आययुडीपी भागातील व्यसनमुक्ती केंद्रात बनावट दस्तऐवज तयार करुन केलेला गैरव्यवहार

**(२१) * १२४४१० श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरातील (जि.वाशिम) आययुडीपी भागातील व्यसनमुक्ती केंद्र हे केवळ कागदोपत्री सुरू असून बनावट दस्तऐवज बनवून शासनाच्या निधीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदरहू व्यसनमुक्ती केंद्र चालविणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

माहे मे, २०१८ मध्ये वा त्या सुमारास अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, सदर संस्थेविरुध्द सप्टेंबर, २०१७ मध्ये सदर केंद्र बंद असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर चौकशी केली असता सदर संस्था बंद असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर संस्था रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी असतानाही अवैधपणे दारु विक्री होत असल्याबाबत

**(२२) * ११६६२४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीचा निर्णय लागू झाल्यानंतर गत तीन वर्षात सुमारे ५१ कोटी रुपयांची अवैध दारु जप्त करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी २२,३३६ गुन्हे दाखल असल्याचे निदर्शनास आले असून जिल्ह्यामध्ये दारुबंदी होऊनही मोठ्या प्रमाणात दारुसाठा जप्त होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली तसेच दारुबंदीची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. शासनाने चंद्रपूर जिल्हयात दि.१.४.२०१५ पासून दारुबंदी करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर दि.१.४.२०१५ ते ३०.४.२०१८ या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून एकूण १७८८ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये ८५५ आरोपींना अटक करून रु.२.४९ कोटी इतका मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, पोलीस विभागाकडून याच कालावधीमध्ये, एकूण २३६६३ प्रकरणांमध्ये २६२४९ आरोपींना अटक करण्यात आली असून, सुमारे रु.५४.०२ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हयाचे सीमालगतच्या यवतमाळ, नागपूर, भंडारा या जिल्ह्यातून तसेच तेलंगणा व मध्यप्रदेश या राज्यातून चोरट्या मार्गाने बेकायदेशीररित्या मद्य आणण्यात येते.
(३) राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस विभाग यांच्याकडून अवैध दारु बाळगणे, वाहतूक, साठा, निर्मिती व विक्री करणे याबाबत प्राप्त तक्रारी/ खबरी यावर कारवाई करून अंकुश ठेवण्यात येतो. यामध्ये गुन्हे दाखल करण्यात येवून मा.न्यायालयामध्ये प्रकरणे दाखल करण्यात येतात. चंद्रपूर जिल्हयात दि.१.४.२०१५ ते दि.३०.४.२०१८ या कालावधीत ३२५० आरोपीविरूध्द मुंबई दारुबंदी कायद्यातील कलम ९३ खाली कारवाई करण्यात आली आहे. मुंबई पोलीस कायद्यानुसार १९१ आरोपीविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच, २७ आरोपीविरूध्द एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला आहे.
(४) चंद्रपूर जिल्हयामध्ये दारुबंदीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

अ) अवैध दारु विक्री, वाहतूक करणाऱ्यांवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

ब) सराईत गुन्हेगारांकडून कलम ९३ अन्वये चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

क) चंद्रपूर जिल्हयाच्या सीमावर तेलंगणा राज्यात जाणाऱ्या रस्त्यावर तपासणी नाका मौजे लक्कडकोट तालुका राजुरा येथे उभारण्यात आला आहे.

ड) चंद्रपूर जिल्हयाला लागून असणाऱ्या व शेजारील जिल्हयातून अवैध मद्य वाहतूक होवू नये म्हणून मुख्य व उपरस्ते यावर गस्त घालण्यात येते.

इ) तसेच नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात येते.

ई) पोलीस विभागाच्या समन्वयाने वेळोवेळी मोहिमा राबविण्यात येतात.

उ) लगतच्या जिल्हयातील अधिकाऱ्यांमार्फत विशेष मोहिम राबविण्यात येते.

ऊ) ग्रामरक्षक दलाच्या माध्यमातून व जनतेच्या सहभागातून अवैध मद्य विक्रीच्या धंद्यावर नियंत्रण आणण्यात येत आहे.

ए) मध्यवर्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येऊन तक्रारीसाठी जनतेला टोल फ्री क्रमांक व व्हॉटसअॅप क्रमांक प्रसिध्द करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेंदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील एका व्यक्तीचा विजेच्या तारेला स्पर्श होऊन झालेला मृत्यु

**(२३) * १२१२२७ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेंदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील श्री.सुरेश विठ्ठल माळी (वय ३८) याचा विहिरीत पोहायला जात असतांना तुटलेल्या विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या गैरकारभारामुळे विजेच्या तारा खाली आल्याने शॉटसर्किट होऊन मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत तसेच खाली आलेल्या विजेच्या तारा दुरूस्त करण्याबाबत व यास जबाबदार असणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर अपघाताची विद्युत निरीक्षक, कोल्हापूर कार्यालयामार्फत दिनांक १०/०४/२०१८ रोजी चौकशी करण्यात आली आहे.

लघुदाब वाहिनीच्या तुटून पडलेल्या विद्युतभारित वाहकाच्या संपर्कात आल्यामुळे विद्युत धक्का बसून सदर अपघात झाल्याचे चौकशीत आढळून आले आहे.

(४) दिनांक १०/०४/२०१८ रोजी सदर घटना घडल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार मयत व्यक्तीच्या वारसास तातडीची आर्थिक मदत रु.२०,०००/- दिनांक १०/०४/२०१८ रोजी देण्यात आलेली आहे. अपघातग्रस्ताच्या वारसदाराकडून सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीच्या नियमानुसार करण्यात येईल.

भविष्यात तारा तुटून अपघात होवू नयेत यासाठी रेंदाळ परिसरात वीज तारांना ३००० स्पेसर्स बसविण्यात आले आहेत व रेंदाळ परिसरातील रोहित्र वितरण पेटयांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेच्या अनुदान वाटपात झालेला गैरव्यवहार

**(२४) * ११८३६४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या अनुदान वाटपात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनुदान वाटप करण्याबाबत तसेच अनुवाद वाटपात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील बंद कारखान्यात बेकायदेशीरपणे मळीची निर्मिती करण्यात आल्याबाबत

**(२५) * १२२३१५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील अवसायनात निघालेला एक कारखाना बंद असल्याचे भासवून या कारखान्यातून मळीची निर्मिती केल्यानंतर इंडियन ऑईल या

नावाचा वापर केलेल्या टँकरमधून मळीची वाहतूक होत असतांना नांदेडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने परभणी जिल्हयात टँकरसह साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय. तथापि सदर कारखाना नांदेड जिल्हयातील नसून मे.त्रिधारा शुगर लि., आमडापुर हा परभणी जिल्हयातील आहे.

(२) व (३) मे. त्रिधारा शुगर लि., आमडापुर, ता.जि.परभणी या कारखान्यातून इंडियन ऑईल कंपनीचे बोधचिन्ह असलेला टँकर क्र.एमएच-०४-डीडी-१४७४ मधून बेकायदेशीर मळीची वाहतूक करीत असताना मौजे इसाद शिवार, ता.गंगाखेड, जि.परभणी येथे निदर्शनास आल्यामुळे निरीक्षक, विभागीय भरारी पथक, औरंगाबाद यांनी संबधितांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हा रजि. क्र.१५३/२०१८, दि.२५.५.२०१८ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या कारवाईत चार इसमांना अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची टँकरसह एकूण किंमत रु.५,६०,०००/- इतकी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने जाहीर केलेल्या स्टार्ट अप धोरणाच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभारण्याबाबत

**(२६) * ११७४९३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय**

**वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जाहीर केलेल्या स्टार्ट अप धोरणाच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले असून परिणामी मुंबई व उर्वरित महाराष्ट्रात स्टार्टअप कंपन्या सुरु होण्याचे प्रमाण गत ३ वर्षात कमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढण्यासाठी मेक इन इंडिया, मॅग्नेटिक महाराष्ट्र, स्टार्टअप इंडिया इत्यादी योजनांच्या माध्यमातून उदयोगधंदयात वाढ होण्यासाठी शासनाने प्रयत्न सुरु केले असतांनाही राज्यातील  वातावरण उद्योगास पोषक नसल्याने सदरहू उद्योग शेजारील राज्यात स्थंलातरीत होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "मेक इन महाराष्ट्र" या योजनेंतर्गत आतापर्यंत राज्यात किती गुंतवणूक करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे व त्यानुसार आतापर्यंत किती जणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

(४) तसेच स्टार्ट अप धोरणाच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने कोणती कर्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०५/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र राज्य नाविन्यतापूर्ण स्टार्टअप धोरण, २०१८" मंजूर करण्यात आले असून महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) मार्फत राज्यात सदर धोरण राबविण्यात येत

आहे. सदर धोरण दिनांक ०५/०२/२०१८ पासून राबविण्यात येत असल्याने मागील ३ वर्षात मुंबई व उर्वरित महाराष्ट्रात स्टार्टअप कंपन्या सुरु होण्याचे प्रमाण कमी झाले आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

(२) नाही. राज्य शासनाने विविध माध्यमातून केलेल्या प्रयत्नांमुळे राज्यात औद्योगिक गुंतवणूकीत वाढ झाली आहे. अन्य राज्यात उद्योग स्थलांतरित झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) मेक इन इंडिया सप्ताह-२०१६ दरम्यान "मेक इन महाराष्ट्र" अंतर्गत उद्योग विभागाशी निगडीत एकूण २८५० सामंजस्य करार झाले व त्याव्दारे एकूण ३.९३ लक्ष कोटी गुंतवणुक अपेक्षित होती. सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीची प्रगती खालीलप्रमाणे आहे:-

| **सामंजस्य करार** | **संख्या** | **गुंतवणुक (रु.कोटी)** | **प्रस्तावित रोजगार** |
|---|---|---|---|
| पुर्ण | १०३६ | ७३५०६ | २०८२६० |
| बांधकाम चालू असलेले प्रकल्प | ५२३ | १६६३२० | ८२३३४० |
| प्राथमिक टप्पे पुर्ण केलेले प्रकल्प | ७६१ | १४३८०५ | १७०३५६ |
| एकूण | २३२० | ३८३६३१ | १२०१९५६ |

(४) महाराष्ट्र राज्य नाविन्यतापुर्ण स्टार्टअप धोरण, २०१८ ची अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची (MSInS) स्थापना करण्यात आली आहे. सदर सोसायटीची संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत दिनांक १८/०८/२०१७ रोजी नोंदणी करण्यात आली असून सोसायटीमार्फत राज्यात नाविन्यपुर्ण स्टार्टअप धोरण राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) प्रकल्प कार्यालयामार्फत काढण्यात आलेल्या वसतीगृहातील भोजनाच्या निविदेमध्ये झालेली अनियमितता

**(२७) * १२४६८८ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पाढंरकवडा अंतर्गत येणा-या मुला-मुलींच्या १४ वसतीगृहामध्ये शैक्षणिक सत्र दिनांक २६ जून, २०१८ पासून सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी निविदा मागविण्यात आल्या व निविदा भरण्याचा शेवटचा दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ असतांना प्रकल्प कार्यालयातील अधिकारी यांनी निविदेबाबत कोणतीही मुदतवाढ नसतांना दिनांक २० व २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निविदा भरण्याची प्रक्रिया केली असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरलेल्या निविदेमध्ये अनियमितता असल्याच्या तक्रारीवरुन आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी ३ वेळा निविदा रद्द करून फेरनिविदा काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदेमध्ये अनियमितता झाली असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अनियमितता करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

निविदा प्रक्रीयेबाबत प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांना तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त तक्रारीनुसार ज्या वसतीगृहांसाठी मुदतीनंतर निविदा भरण्यात आल्या होत्या त्या वसतीगृहांच्या भोजनपुरवठ्याच्या ई-निविदा प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी रद्द करून फेरनिविदा प्रसिद्ध केल्या आहेत.

(३) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीने वीज ग्राहकांकडून वसूल केलेली रक्कम परत करण्याबाबत

**(२८) * १२१९३५ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने वीज ग्राहकांकडून वसूल केलेल्या सुमारे ३७७ कोटी ८० लाख रुपये रकमेचा परतावा हा व्याजासह ७०० कोटींवर गेला असून एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असूनही परतावा देण्याबाबतच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २० जानेवारी, २००५ पासून आजपर्यंत विजेचे खांब, वीज वितरण वाहिन्या यावर खर्च केलेल्या सर्व रकमा परताव्यासह पात्र असून व्याजासह त्या परत कराव्यात असे आदेश आयोगाने दिले असून एस.एल.सी आणि ओआरपीच्या स्वरुपात वसूल केलेली रक्कमही महावितरण कंपनीने परत करावी, अशी मागणी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार वीज ग्राहकांकडून वसूल केलेली व्याजासह असलेली ७०० कोटी रुपयांची थकबाकी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. परतावा देण्याची कार्यवाही महावितरण कंपनी मार्फत सुरु आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेल्या अनुसूचित आकाराव्यतिरिक्त वसूल करण्यात आलेले सर्विस लाईन आकार, आऊटराईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मिटरची किंमत वीज ग्राहकास व्याजासह परतावा करण्याच्या दृष्टीने दि. १२ ऑक्टोबर २०१७ रोजी महावितरण कंपनीने परिपत्रक जारी केले आहे. तसेच महावितरण कंपनीच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे विशेष वेबबेस प्रोग्राम बनविले आहे. सदर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अशा ग्राहकांच्या नोंदीची पडताळणी झाल्यानंतर लेखापरीक्षित रक्कम देय बिलामधून परस्पर परतावा करण्यात येत आहे.

दि. २१ जून २०१८ अखेर १२३५ उच्चदाब ग्राहकांना रु. २६६८.६४ लाख व्याजासह त्यांच्या वीज देयकामध्ये समायोजित करून अदा करण्यात आले आहे. तसेच २४१२ लघुदाब ग्राहकांना रु. १७९.६७ लाख व्याजासह त्यांच्या

वीज देयकामध्ये समायोजित करून अदा करण्यात आले आहे. उर्वरित ग्राहकांच्या बाबतीत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सामाजिक न्याय विभागातील विविध योजनांच्या प्रसिद्धीसाठी खर्च केलेल्या देयकांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२९) * ११८७०३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय विभागातील विविध योजनांच्या प्रसिद्धीसाठी अवघ्या चार दिवसांत ६ कोटी रुपये खर्च केल्याचा प्रकार निदर्शनास आल्यानंतर, सदर बाब संशयास्पद आढळल्याने खर्चाची देयके रोखण्यात आल्याचे दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी प्रसिद्धी मोहिमेच्या कामाचे वाटप करुन ही कामे ३१ मार्च पुर्वी पुर्ण झाल्याचे दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनांसाठी सामाजिक न्याय विभागामार्फत ई-टेंडरिंग करण्यात आले होते का, तसेच कोण-कोणत्या एजन्सीला तीन ते चार कोटी रुपयांचे देयक देण्यात आले आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दि.२५ मार्च, २०१७ च्या कार्यादेशान्वये सामाजिक न्याय विभागासह अन्य विभागांच्या योजनांची वर्तमानपत्रे, रेडिओ, टी.व्ही. चॅनलवर दि.२७ मार्च, २०१७ ते दि.३० मार्च, २०१७ या कालावधीत जाहिरात करण्याचे आदेश

देण्यात आले. काही वृत्तपत्रे/जाहिरातदार संस्थांनी उपप्रमाणके सादर केल्याने, तसेच देयकांमध्ये त्रुटी असल्याने अशी देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विहित कार्य पद्धतीचा अवलंब करुन मा.मंत्री (सा.न्या.) यांनी विशेष घटक योजना, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती कार्य व ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांना विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी द्यावयाच्या आराखड्यास मान्यता दिली. सदर आदेशानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत संबंधित संस्थांना कार्यादेश देण्यात आले आहेत. कोणत्याही संस्थेला एक रकमी तीन ते चार कोटी रुपयांपर्यंत कार्यादेश देण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीतील साखर गोदामात पाकिस्तानातून आयात करण्यात आलेली साखर मागविण्यात आल्याबाबत

**(३०) * ११६७१७ श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखरेचे विक्रमी उत्पादन झालेले असतानाही नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीतील साखर गोदामात पाकिस्तानातून ६० लाख मेट्रिक टन साखर आयात केली गेल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाब ही एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिली असून पाकिस्तानातील साखर बाजारात विकू न देण्यासाठी त्यांनी आंदोलन केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात साखरेचे विक्रमी उत्पादन झालेले असतांनाही पाकिस्तानातील साखर राज्यात आयात करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याबाबत अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे, गोदामामध्ये ०.००२८ लाख मे.टन साखर आढळून आली.

(२) होय.

(३) केंद्र सरकारने निर्यात वाढीसाठी एखादया वस्तूची निर्यात केल्यास त्यासाठी लागणारा कच्चा माल आयात करता येईल असा नियम केला होता त्याचा फायदा घेऊन केंद्र/राज्याची परवानगी न घेता व्यापाऱ्याने पाकिस्तानला चॉकलेट निर्यात करून साखर आयात केली. हया आयातीमध्ये केंद्र तसेच राज्य सरकारचा काहीही संबंध नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रतिक्षा यादीवरील कृषी पंपांना उच्चदाब वीज वितरण प्रणालीतून वीज जोडणी देण्याबाबत

**(३१) * ११८३२१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ लाख ४९ हजार ३५७ शेतक-यांना दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेरपर्यंत अनामत रक्कम भरुनही त्यांच्या कृषीपंपाना अद्याप वीज पुरवठा दिला गेला नसल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये खानदेशातील सुमारे २००००, चंद्रपूर जिल्हयात ६०००, गडचिरोली जिल्हयात ५०००, भंडारा जिल्हयात ५०००, गोंदिया जिल्हयात ५००० आणि नागपूर जिल्हयात ६००० या प्रमाणे विदर्भातील सुमारे २७ हजार कृषीपंपांना अनामत रक्कम भरुनही गत २ वर्षापासून वीज जोडणी दिली गेली नसल्याची माहिती दिनांक २ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील प्रतीक्षा यादीवरील उक्त कृषी पंपांना उच्चदाब वीज वितरण प्रणालीतून (एचव्हीडीएस) वीज जोडणी देण्यासाठी ५०४८ कोटी रुपयांच्या योजनेला राज्य मंत्री मंडळाच्या माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मंजुरी दिल्याचे निदर्शनास आले असून या योजनेमुळे एका रोहित्रावर केवळ दोन शेतक-यांना वीज जोडणी देण्यात येणार आहे व त्यामुळे एका रोहित्रावर जादा ताण येऊन जळणे व त्यामुळे वीज पुरवठा खंडित होणे बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना राबविण्यासाठी महावितरण कर्ज रोखे काढणार असून राज्य शासन त्यास हमी देणार असल्याने सदर योजना कधी पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(५) तसेच सदर प्रकरणी प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडण्या कधीपर्यंत देण्यात येणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : (१) हे खरे आहे.

(२) खानदेशात मागील २ वर्षामध्ये विविध योजनांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १२५४० व सन २०१७-१८ मध्ये १०,६३८ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच मागील २ वर्षामध्ये विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर या जिल्हयात विविध योजनांतर्गत सन २०१६-१७ मध्ये अनुक्रमे ४१०४, २७७३, ३३६२, ३१३१ व ४३३३ असे एकूण १७,७०३ व सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे २००४, २२०८, १३९५, २३४८ व २१५९ असे एकूण १०,११४ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदर योजनेची अंमलबजावणी दि.१५ ऑगस्ट, २०१८ पासून सुरु करण्यात येणार आहे.

(५) उपरोक्त योजनेंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या कालावधीत वीज जोडण्या देण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील अतिरिक्त अंबरनाथ औद्‌यागिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात सीएट या कंपनीने बेकायदेशीर उत्खनन केल्याबाबत

**(३२) * ११७६२५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील अतिरिक्त अंबरनाथ औद्‌यागिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात सीएट या कंपनीने गाव तलाव बुजवून काकोले गावठाण क्षेत्रात कंपनी सुरु केल्याचे तसेच बेकायदेशीरपणे स्फोटके लावून उत्खनन केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदशर्नास आले व त्यानुषंगाने गाव तलाव बुजवून त्याठिकाणी बेकायदेशीर संरक्षक भिंत बांधून कंपनी सुरु करणाऱ्या व बेकायदेशीरपणे स्फोटके लावून उत्खनन करणा-या कंपनी मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक ०९/०५/२०१८ च्या दैनिक लोकसत्ताच्या ठाणे पुरवणीमध्ये “वालधुनी नदीपात्रात आत सुरुंगस्फोट” या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. तसेच तक्रारदार श्री.सुधाकर झोरे यांनी वालधुनी नदीपात्राजवळ अवैधपणे उत्खनन करुन आणि दगड फोडण्यासाठी सुरुंग

लावून अनधिकृत बांधकाम करुन प्रवाहाला अडथळा आणणाऱ्या बांधकामाविरुध्द कारवाई करण्यासंबंधी दि.२३/०५/२०१८ चे तक्रारपत्र महामंडळास दि. २५/०५/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामधील जी-२, हा १९६७९९.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मे.सिएट स्पेशालिटी टायर्स प्रा.लि यांना वाटप करण्यात आलेला आहे. सदर भुखंडाचा ताबा दि.०१/०९/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. या भूखंडावरील नियोजित इमारतीचे बांधकाम नकाशे कार्यकारी अभियंता अंबरनाथ (स्थापत्य) विभाग यांनी दि.२०/१०/२०१६ अन्वये एकूण ५८६५०.८३ चौ.मी इतक्या क्षेत्रफळासाठी मंजूर करण्यात आलेले आहेत व त्यानुसार सीएट कंपनीमार्फत बांधकाम सुरु आहे.

महामंडळामार्फत सदर कंपनीस ब्लास्टिंग करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. ब्लास्टिंगसाठी परवानगी देण्याची बाब महामंडळाशी निगडीत नाही.

सदर भूखंडाला दिलेल्या ताबा पावतीसोबत जोडलेल्या नकाशावरुन भूखंडावर गाव तलाव अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास येते. तथापि, भूखंडामधून एक नैसर्गिक प्रवाह ऋतुनुसार वाहत असतो. सदर नैसर्गिक प्रवाहास संरक्षक भिंत बांधण्याचे काम कंपनीतर्फे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांच्या दुरुस्तीकरिता असलेल्या नियमावलीचे महावितरण कंपनीकडून होत असलेले उल्लंघन

**(३३) * ११६७०० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे लघुदाब (४४० व्होल्ट) व उच्चदाब वाहिन्यांच्या (११ ते ३३ केव्ही) दुरुस्तीसाठी कर्मचारी प्राधिकृत करण्यासाठी नियमावली असताना महावितरण कंपनीच्या कार्यालयाकडून त्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात माहे एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात महावितरण कंपनीच्या कोथरुड उपविभागांत एका लघुदाब वाहिनीवर काम सुरू असताना २८ वर्षीय कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागुन जागीच मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे कर्मचारी प्राधिकृत करताना विद्युत निरीक्षकांकडून नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्यामुळे दरवर्षी अपघात होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले असून महावितरण कंपनीकडून अशा प्राधिकृत कर्मचाऱ्यांची यादी तयार करताना शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, संबंधित काम करण्यास कर्मचारी पात्रतेचे निकष ठरविताना शासन अथवा शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र, विद्युत निरीक्षक अनुज्ञापक मंडळ यांच्याकडून दिले जाणारे पर्यवेक्षक प्रमाणपत्र इत्यादी गोष्टींची पडताळणीही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमांचे पालन न करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघात टाळण्याकरिता नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयाकडून लघुदाब (४४० व्होल्ट) व उच्चदाब वाहिन्यांच्या (११ ते ३३ केव्ही) दुरुस्तीसाठी प्राधिकृत अभियंते व कर्मचाऱ्यांची यादी प्रसृत करण्यात येते व माहितीसाठी त्याची प्रत संबंधित विद्युत निरीक्षकांकडे पाठविण्यात येते. संबंधीत प्राधिकृत अभियंते व कर्मचाऱ्यांकडून लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांचे दुरुस्तीचे काम करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. महावितरणकडून अशा प्राधिकृत कर्मचाऱ्यांची यादी तयार करताना शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, संबंधित काम करण्यास पात्र असल्यासाठीचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र या गोष्टींची खातरजमा करण्यात येते.

(४) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, पुणे यांनी चौकशी केली असून दि.२०/०४/२०१८ रोजी अपघातग्रस्त कर्मचाऱ्याचा हनुमान नगर, केळेवाडी, कोथरुड, पुणे, येथील घरगुती ग्राहकाची सर्व्हिस वायर बदलत असतांना इतर ग्राहकाच्या सर्व्हिस वायर मधून आलेल्या रिटर्न करंटचा धक्का लागून तंत्रज्ञाचा शिडीवरुन खाली पडून मृत्यू झाला. सदर प्रकरणी अपघातग्रस्ताच्या वारसास महावितरण कंपनीकडून तात्काळ मदत रु.२५,४१८/- देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमनातून अन्नधान्य-कडधान्य मुक्त करण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगट समितीबाबत

**(३४) * १२४२३२ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमनातून अन्नधान्य व कडधान्य मुक्त करण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अभ्यासगट समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालातील समितीने केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू अहवालातील कोणकोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या असून त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवरे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील उपकेंद्र उभारण्यासाठी भू-संपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(३५) * १२३११७ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने हिवरे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे वीज उपकेंद्र उभारण्याकरिता संपादित केलेल्या शेतजमिनीचा मोबदला अद्यापही संबंधित शेतकऱ्यांस दिला नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादित केलेल्या शेतजमिनींचा मोबदला तातडीने मिळावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व शेतकऱ्यांनी उप कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, सिन्नर-१ उपविभाग, सिन्नर (नाशिक) यांना दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने संपादित केलेल्या शेतजमिनींचा मोबदला तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ठाणगाव (हिवरे) ता.सिन्नर, जि.नाशिक येथील शेत जमीनीचा मोबदला (२/३ अगाऊ रक्कम) रु. ६७,०१९/- चा भरणा विशेष भू-संपादन अधिकारी, नाशिक यांचे कार्यालयात दि.२३/१०/२००३ रोजी कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण, नाशिक यांनी केला आहे. उपजिल्हाधिकारी (भू-संपादन), नाशिक यांनी दिलेल्या माहितीनुसार भूसंपादन प्रस्ताव क्र.२८/९९ चा निवाडा दि.२८/०६/२००६ रोजी त्यांच्या कार्यालयाने जाहीर केला असून भू-संपादन मोबदला वाटपाची तारीख २५/०९/२००६ अशी ठेवली होती. सदर तारखेस गट नं. २१ चे कब्जेदार त्यांच्या कार्यालयात मोबदला

स्विकारण्यासाठी हजर राहिलेले नाहीत. तसेच चौकशीसाठीही हजर राहिले नाहीत. गट नं. २१ चे कब्जेदार यांना १२ (२) ची नोटीस देवूनही ते अद्यापपर्यंत मोबदला स्विकारण्यासाठी त्यांच्या कार्यालयात आलेले नाहीत. त्यामुळे भू-संपादन मोबदल्याचे वाटप अद्यापपर्यंत झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) आदिवासी प्रकल्प विभागातंर्गत धामणगाव आश्रमशाळेत अधीक्षकांनी विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याबाबत

**(३६) * ११९५९६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) आदिवासी प्रकल्प विभागांतर्गत धामणगाव शासकीय आश्रमशाळेत अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल यांनी दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा वारंवार विनयभंग केल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर तलासरी पोलीस ठाण्यात अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल यांचेविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही महिन्यांपासून अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल यांचेकडून विद्यार्थीनींचे लैंगिक शोषण सुरु असल्याचा प्रकार निदर्शनास येऊनही त्यांचेविरुध्द यापूर्वीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, या आश्रमशाळेत मुलींचे लैंगिक शोषण सुरु असताना अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल यांच्या दहशतीमुळे मुलींनी तक्रार केली नसल्याचे प्रशासनाला माहिती असूनही संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल यांचेविरुध्द वेळीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषींवर व त्यांच्यावर वेळीच कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३), (४) व (५) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू या प्रकल्पातंर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, धामणगाव, ता.डहाणू, जि.पालघर या शाळेतील अधीक्षक श्री.सुर्यकांत बागल याने दि.३१/१२/२०१७ रोजी कु.दर्शना लाडक्या सुतार व कु.सरस्वती लाडक्या डोलारे या निवासी विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याची बाब आढळून आल्याने त्याचे विरूध्द पोलिस स्टेशन, तलासरी, जि.पालघर येथे दि.२/३/२०१८ रोजी बालकांचा लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा रजिस्टर क्र.२८/२०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर गुन्हाचा तपास करून आरोपी विरूध्द ३०/४/२०१८ रोजी दोषरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच प्रकरणी श्री. सुर्यकांत बागल, अधीक्षक यांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी त्यांचे दि.३/३/२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले असून त्याचे विरूध्द रोषारोपपत्र बजावून प्रशासकीय कारवाई सुरू करण्यात आली आहे.

-----------------

## तरोडा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील शेतक-यांना विद्युत जोडणी न करता देयके देण्यात आल्याबाबत

**(३७) * ११९२९९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तरोडा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील मातोळा महावितरण कंपनीने विद्युत जोडणी न करता शेतक-यांना हजारो रुपयांची देयके देऊन गैरव्यवहार केल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार विद्युत जोडणी न करता हजारो रुपयांची देयके देणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाची बातमी दैनिक देशोन्नती मध्ये दि.२७/०४/२०१८ रोजी प्रसिध्द झाली होती. मात्र मोताळा उपविभागाअंतर्गत तरोडा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे विद्युत जोडणी न करता कोणत्याही शेतकऱ्यांना महावितरण कंपनीमार्फत वीज देयके देण्यात आलेली नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदूरबार जिल्ह्यातील शहादा बाजार समितीमध्ये हमीभावापेक्षा कमी दराने हरभऱ्याची खरेदी केल्याबाबत

**(३८) * ११८३१३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्ह्यातील शहादा बाजार समितीमध्ये शासनाने जाहिर केलेल्या हमी भावापेक्षा कमी दराने हरभऱ्याची खरेदी करणाऱ्या आठ व्यापाऱ्यांचे परवाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास रद्द करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समित्यांचे दोन दिवसातील ऑनलाईन खरेदीदार तपासले असता बहुतांश ठिकाणी हरभऱ्याची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने झाल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शेतक-यांची आर्थिक फसवणूक करणा-या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतक-यांच्या

मालाची हमीभावाने खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही, दिनांक ५.४.२०१८ ते ४.५.२०१८ पर्यत बाजार समितीत शेतमालाचा लिलाव होवू शकलेला नाही.
(३) होय.
(४) शासकीय आधारभुत खरेदी केंद्रा व्यतिरीक्त शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने शेतमालाची खरेदी केल्याचे दिसून येते. तथापि, सदर शेतमाल हा एफएक्यू दर्जाचा असल्याची कोणतीही पडताळणी झालेली नाही. त्यामुळे व्यापाऱ्याने सदर ८ व्यापाऱ्यांचे परवाने बाजार समितीने रद्द केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानिर्मिती प्रकल्पांना नियमित कोळसा पुरवठा करण्याबाबत

**(३९) * ११८६६८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विजेची मागणी माहे एप्रिल, २०१८ मध्ये २४ हजार मेगावॅट वर गेली असून महानिर्मिती प्रकल्पांना लागणा-या कोळशाची मागणी वेळेवर केली नसल्यामुळे कोळशाअभावी वीज निर्मितीवर परिणाम होऊन वीज टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १२ औष्णिक ऊर्जा प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पात अवघे तीन दिवस पुरेल एवढाच कोळसा शिल्लक असून ७ प्रकल्पात जेमतेम ६ दिवस पुरेल एवढाच साठा उपलब्ध असल्याने त्याचा वीज निर्मितीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानिर्मितीच्या अनेक प्रकल्पांत पुरेसा कोळसा उपलब्ध नसतानाही 'वेकोली' कंपनीकडून महानिर्मितीला कोळसा पुरवठा न करता खासगी वीज निर्मिती कंपनीला कोळसा पुरवठा झाल्याचे निदर्शनास आले आहे तसेच महानिर्मितीच्या अधिका-यांनी भुसावळ आणि नाशिकला पुरविला जाणारा कोळसा सहा महिन्यांकरीता खासगी कंपन्यांना देण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले त्यानुसार सबंधित दोषी अधिका-यांविरुध्द कारवाई करण्याबाबत व औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना नियमित कोळसा पुरवठा होऊन भारनियमन टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील वीजेची मागणी माहे एप्रिल, २०१८ मध्ये २३७१७ मे.वॅ. एवढी होती व महावितरण कंपनीची वीजचे उच्चत्तम मागणी २०३४० मे.वॅ. एवढी होती. कोळश्यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांना कोळश्यांच्या उपलब्धतेत आलेल्या अडचणीमुळे वीजेची उपलब्धता कमी मिळत होती. महावितरण कंपनीने लघुकालीन निविदेव्दारे तसेच पॉवर एक्सेंजमध्ये दररोज bid करुन सुमारे १६०० मे.वॅ. ते २२०० मे.वॅ. वीज खरेदी करुन, वीज मागणी व पुरवठयातील तफावत भरुन काढली.

औष्णिक विद्युत केंद्राना नियमित कोळसा पुरवठयासाठी, महानिर्मिती कंपनीने केंद्र सरकारच्या अखत्यारीतील कोल इंडिया लि. या कंपनीच्या उपकंपन्या WCL, MCL, SECL आणि सिंगारेनी कोल कंपनी (SCCL) यांच्याशी दीर्घ कालीन इंधन पुरवठा करार केले आहेत. कोळसा पुरवठा नियोजनासाठी महानिर्मिती कंपनीकडून कोळसा कंपन्यांना प्रत्येक पुढील महिन्यासाठी आगाऊ कोळसा मागणी (Order booking programe) दिले जाते.

औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा साठा व कोळसा पुरवठा वाढीसाठी महानिर्मिती कंपनीव्दारे कोळसा कंपन्या, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली, यांच्याकडे पत्र व्यवहार व पाठपुरावा करण्यात आल्यामुळे कोळसा साठयात सुधारणा होत आहे. तसेच केंद्र शासनाच्या अखत्यारितील कोळसा कंपन्या व रेल्वेज यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कोळसा रेक्सची संख्या वाढवून दिल्याने कोळसा पुरवठयात आणखी सुधारणा होणे अपेक्षित आहे.

(२) हे खरे आहे.

मे-२०१८ अखेर महानिर्मितीच्या विद्युत केंद्रांमध्ये सरासरी ३ दिवस पुरेल इतका कोळशाचा साठा होता.

(३) केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) यांच्या दिनांक २०.०२.२०१७ अधिसूचनेनुसार, वीज निर्मितीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने देशांतर्गत कोळसा वापरामध्ये लवचिकता आणण्यासाठी केंद्र सरकारने आखलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासंबंधीच्या कार्यपध्दतीनुसार महानिर्मितीच्या भुसावळ संच क्र. ३ आणि नाशिक येथील एका संचाला पुरविला जाणारा कोळसा खाजगी वीज निर्मिती कंपन्यांना तात्पुरत्या स्वरुपात (१ एप्रिल, २०१८ ते २९ नोव्हेंबर, २०१८ अशा आठ महिन्यांकरिता) देऊन त्या बदल्यात त्यांच्याकडून वीज खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यासाठी सदर खाजगी वीज कंपनी, महानिर्मिती आणि महावितरण यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. यातून तयार होणाऱ्या वीजेचा प्रती युनिट दर महानिर्मितीच्या भुसावळ संच क्र. ३ व नाशिक येथील संचांच्या दराच्या तुलनेत कमी आहे.

(४) औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठा होण्यासाठी महानिर्मिती व शासन स्तरावर खालीलप्रमाणे विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१) अध्यक्ष, कोल इंडिया लि., सदस्य (वाहतूक) रेल्वे, संचालक (पणन)- डब्लू.सी.एल. व कोल इंडिया लि., अतिरिकत सचिव व सचिव केंद्रीय कोळसा मंत्रालय, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) - उपगट समिती तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांचे सोबत, केंद्रीय कोळसा मंत्रालय, कोल इंडिया लि., केंद्रीय विद्युत प्राधिकरण, रेल्वेज यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध बैठका घेण्यात आल्या.

२) महानिर्मितीने SCCL या कोळसा कंपनीसोबत सध्याच्या इंधन पुरवठा कराराखेरीज सन २०१८-१९ मध्ये १५ लक्ष मे.टन अतिरिक्त कोळसा घेण्यासाठी सामंजस्य करार केला आहे व त्यानुसार कोळसा पुरवठा सुरु आहे.

३) कोळशाचा तुटवडा भरुन काढण्यासाठी महानिर्मितीच्या जुन्या संचांचे (Old decommissioned Units) ४.२२९ द.ल.मे.टन इतक्या कोल लिंकेजचे कोराडी विस्तारित प्रकल्पकडे (३ X ६६० मे.वॅट Super critical Units) हस्तांतरण करण्यासाठी संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना महानिर्मिती कंपनीकडून विनंती करण्यात आली आहे.

४) महानिर्मितीने संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र (३ X ६६० मे.वॅट), चंद्रपूर (२ X ५०० मे.वॅट) आणि परळी (१ X २५० मे.वॅट), या संचांसाठीच्या सध्याच्या ब्रिज लिंकेजला वाढीव कोळसा मात्रेसह पुढील ३ वर्षासाठी (सन २०२१ पर्यंत) मुदत वाढ देण्याची विनंती केली आहे.

५) महानिर्मितीने डब्ल्यू.सी.एल.च्या कोळसा खाणींमधून दररोज अंदाजे ११८०० मे.टन एवढा कोळसा रस्ता वाहतुकीने औष्णिक विद्युत केंद्रांना पुरवठा करण्याचे काम कंत्राटव्दारे सुरु केले आहे.

६) कोळसा पुरवठा वाढीसाठी कोळसा कंपन्या व केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली यांचेसोबत महानिर्मिती व शासन स्तरावर सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पिंपरी पेंढार येथील शेतक-यांच्या टॉमेटोला बाजारभाव मिळण्याबाबत

**(४०) * ११८५८०   श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पिंपरी पेंढार येथील शेतकऱ्यांनी टॉमेटोला योग्य भाव मिळत नसल्याने चारशे टन टोमॅटो शेतात फेकून दिल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, टॉमेटोला योग्य दर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१)टोमॅटोला बाजारभाव मिळत नसल्याने व उत्पादन खर्च निघत नसल्याने पिंपरी पेंढार येथील श्री.सावळेराम कुटे यांनी आपली ११ एकर टोमॅटो बाग उपटून टाकली. अशा आशयाची बातमी दिनांक १४/०४/२०१८ च्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.

(२) व (३)  खरेदी संदर्भामध्ये स्पर्धा  होऊन शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य दर मिळावा, म्हणून फळ व भाजीपाला नियमनमुक्त केला आहे. मध्यस्थाची साखळी टाळण्यासाठी संत सावतामाळी आठवडे बाजार योजना राबविण्यात येत आहे. तसेच शेतमालाच्या व्यवहारावरील अडत शेतकऱ्यांऐवजी खरेदीदारांकडून वसूल करण्याचा निर्णय केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेगाव पठार (पुणे) येथील होळकर नगर भागात उघड्या विद्युत वाहिनीमुळे जखमी झालेल्या मुलांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४१) * ११६७५३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव पठार येथील होळकर नगर भागात रस्त्याच्या खोदाईच्या कामादरम्यान उघड्या विद्युत वाहिनीमुळे दोन मुले गंभीररित्या भाजल्याची घटना दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटना घडण्यापूर्वी जवळपास आठ तास घटनास्थळी वायरिंगचे शॉर्ट सर्किट सुरु होते व त्यामधून धूर येत असतांना नागरिकांनी संबंधित ठेकेदारास व महावितरण कंपनीच्या कार्यालयास कळविले असतांना देखील वेळेत दखल न घेतल्याने सदर अपघात घडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषींची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अपघातग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे. आंबेगाव पठार होळकर नगर पुणे येथे महानगरपालिकेकडून रस्त्याचे खोदकाम चालू असतांना दि. २१/०४/२०१८ रोजी रस्त्याखालील लघुदाब वाहिन्या व ग्राहकांना वीज पुरवठा करणाऱ्या सेवा वाहिन्यांवर ड्रेनेजचा वजनदार सिमेंट पाईप पडल्यामुळे केबल तुटली व त्यातून ठिणग्या स्पार्किंग बाहेर पडल्या. सदर ठिणग्या पाईपजवळ असलेल्या दोन मुलांच्या अंगावर आल्यामुळे दोघांचेही हात पाय भाजून दुखापत झाली.

(२) हे खरे नाही. सदर अपघाताची घटना घडल्याचे दि. २१/०४/२०१८ रोजी रात्री ९.३० च्या दरम्यान घडल्याचे समजताच तातडीने सहाय्यक अभियंता, धनकवडी शाखा कार्यालय व लाईन स्टाफ घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी घटनास्थळी पाहणी केली असता, त्या भागाकडे विद्युत पुरवठा करणाऱ्या

एल.टी. फिडर पिलर मधील फ्युज वितळल्यामुळे सदर घटनास्थळाचा विद्युत पुरवठा बंद झाला होता. त्यानंतर योग्य ती कार्यवाही करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(३) विद्युत निरीक्षक, पुणे यांच्यामार्फत सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानुसार सदर अपघातास पुणे महानगरपालिका जबाबदार असल्याचे आढळून आल्यामुळे त्यानुसार महानगरपालिकेस त्यांनी कळविले आहे. पुणे महानगरपालिकेचे संबंधित रस्त्याचे ठेकेदार मे. सनराज कन्स्ट्रक्शन यांनी दोन्ही अपघातग्रस्तांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च सुमारे रु.३,८७,३४७/- अदा केला आहे. तसेच अपघातग्रस्तांना महावितरण कंपनीने नियमानुसार तातडीची मदत प्रत्येकी रु.५,०००/- दि.२४/०४/२०१८ रोजी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावर्डे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावासाठी मंजूर झालेली दोन रोहित्रे याच गावात उभारण्याबाबत

**(४२) * ११८१२४ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत जेथे वीज पुरवठा कमी दाबाने होतो त्या गावातील जनतेला या योजनेंतर्गत त्याठिकाणी रोहित्र उभारुन वीज पुरवठा केला जातो व या योजनेंतर्गत सावर्डे गावासाठी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) दोन रोहित्रे मंजूर करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावर्डे गावासाठी मंजूर करण्यात आलेली सदरहू रोहित्रे महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या जिल्ह्यातील अन्य तालुक्यांत हलविल्यामुळे सावर्डे गावातील जनतेने सदरहू मंजूर झालेली रोहित्रे विनाविलंब सावर्डे गावात उभारण्यात यावीत अशा आशयाचे लेखी निवेदन महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या दरम्यान स्थानिक जनतेने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावर्डे गावासाठी मंजूर झालेली दोन रोहित्रे विनाविलंब सावर्डे गावातच उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर मंजूर असलेल्या रोहित्रासाठी सावर्डे गावात आवश्यक ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्याने पोमेंडी (शृगारतळी शाखा) ता.चिपळूण येथे नवीन रोहित्र उभारुन कार्यान्वीत करण्यात आले आहे. तद्नंतर सावर्डेकरवाडी व मराठी शाळा, सावर्डे येथे जागा उपलब्ध झाल्यामुळे आता त्याठिकाणी रोहित्र उभारणी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मिठसागरे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे वीज वितरण कंपनीच्या उच्च दाब वाहिनेमुळे आग लागून डाळिंब बागांचे झालेले नुकसान

**(४३) * १२३११८ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मिठसागरे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या २ एकर डाळिंब बागांना वीज वितरण कंपनीच्या उच्च दाब वीज वाहिनीमुळे आग लागून डाळिंब बाग नष्ट झाल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डाळिंब बागेसाठी केलेली सिंचन व्यवस्था, पाईप व ८३० डाळिंब झाडांच्या झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत. वितरण कंपनी, सिन्नर - २ उपविभाग, सिन्नर (नाशिक) यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) विद्युत निरीक्षक, नाशिक यांनी सदर घटनेची चौकशी केलेली असून त्यांच्या अहवालानुसार सदरची आग ही विद्युत कारणांमुळे लागलेली नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील दलित वस्त्यांच्या विकासाकरिता निधी देण्याबाबत

**(४४) * १२२८५८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागास सन २०१६-२०१७ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत प्राप्त निधी पैकी रुपये दोन कोटी निधी तांत्रीक मान्यता न दिल्याने शासनास समर्पित केला गेल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने निधी समर्पित करावा लागल्याने मोताळासह जिल्हयातील दलित वस्त्या विकासापासून वंचित राहील्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने समर्पित झालेला निधी अनुशेषासह जिल्हा परिषदेस त्वरित वितरीत करण्याबाबत तसेच कामाकाजातील

दुर्लक्षपणामुळे दलित वस्ती सुधार योजनेचा निधी समर्पित करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे आहे.
पंचायत समिती, मोताळा अंतर्गत दलित वस्त्यांच्या विकासाकरीता रुपये २०८.८५ लाख इतक्या निधीस सन २०१६-१७ या वर्षामध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आाहे
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालम, गंगाखेड व परभणी (जि.परभणी) तालुक्यातील नादुरुस्त अवस्थेत असलेली रोहित्रे बदलून देण्याबाबत

**(४५) * ११८७०२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालम, गंगाखेड व परभणी (जि.परभणी) तालुक्यातील जळालेली व नादुरुस्त अवस्थेत असलेली शेती पंपाची व सिंगल फेज रोहित्रे वेळेत बदलून दिली जात नसून तसेच ऑईलचा पुरवठा विहित मुदतीत होत नसल्याने व ती बदलली जात नसल्याने शेतक-यांचे नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यांतील शेतक-यांची शेती पंपाची व रोहित्रांची मंजूर व कार्यारंभ आदेश दिलेली कामे अद्यापपर्यंत अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ ते आजतागायत परभणी जिल्हयातील तालुकानिहाय किती शेती पंपाची रोहित्रे नादुरुस्त वा जळाली असून ती दुरुस्त करुन खंडित विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करण्याबाबत किती कालावधी लागणार आहे तसेच नादुरुस्त रोहित्राकरिता ऑईल पुरवठयाची किती मागणी होती व किती पुरवठा करण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, उक्त मुद्द्यांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार किती नादुरुस्त रोहित्रे वेळेवर दुरुस्त करुन देण्यास विलंब झाला व त्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच अपूर्ण असलेली शेती पंप व रोहित्रांची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. पालम, गंगाखेड व परभणी तालुक्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असल्याने नादुरुस्त रोहित्रे सरासरी ४ दिवसांत बदलण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही. पालम, गंगाखेड व परभणी तालुक्यामध्ये मराठवाडा विदर्भ विशेष पॅकेज - १ च्या अंतर्गत नवीन रोहित्र व कृषीपंप उर्जीकरणाच्या कामांसाठी अनुक्रमे ३.९६ कोटी, ९.७१ कोटी व १०.४२ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या. या निविदांच्या उदिष्टानुसार अनुक्रमे २७, ७९, ७८ असे एकूण १८४ रोहित्र कार्यान्वित करुन उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. तसेच पॅकेज - २ अंतर्गत कामे सुरु आहेत.

(३) सन २०१६ पासून आजतागायत परभणी मंडळामध्ये एकूण ३००७ कृषीपंपाची रोहित्रे नादुरुस्त झाली असून सर्व नादुरुस्त रोहित्रे सरासरी चार दिवसांच्या आत बदलण्यात आली आहेत. परभणी मंडळाला त्यांच्या मागणीनुसार सन २०१६ पासून सुमारे ३९७ कि.लि. ऑईलचा पुरवठा करण्यात आला.

(४) कृषीपंपाचे नादुरुस्त रोहित्रे वेळेत बदलण्यात आली आहेत. मराठवाडा विदर्भ विशेष पॅकेज - १ च्या उद्दिष्टानुसार सर्व १८४ नवीन रोहित्रे कार्यान्वित करुन ३०८२ कृषीपंप उर्जीकरणाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक विकास महामंडळाने अधिसूचना जाहिर करुनही भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत

**(४६) * १२३११९ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांची १५६.५५ हे. आर. शेतजमीन संपादित करण्यासाठी औद्योगिक विकास महामंडळाने अधिसूचना जाहीर करून दोन वर्षे उलटून देखील अद्याप भूसंपादनाची कार्यवाही केलेली नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतजमिनींवर औद्योगिक विकास महामंडळाचे शिक्के पडले असल्याने शेतकऱ्यांस शेतीचे उत्पन्न घेता येत नसून शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे दर निश्चित करून भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी अथवा शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील शिक्के कमी करावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे.

(३) मौजे माळेगाव येथील १५६.५५ हे. आर क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी दिनांक १०/६/२०१६ रोजी लागू करण्यात आल्या असून कलम ३२ (२) ची अधिसूचना दिनांक १०/११/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. संमती भूधारकांच्या ७८.२९ हे. आर क्षेत्राचे संयुक्त मोजणीचे काम दिनांक १८/७/२०१७ रोजी पूर्ण झालेले आहे. कलम ३२ (१) ची कार्यवाही करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच दर निश्चितीबाबत कार्यवाही सूरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.